www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल पब्लिक स्कूल...

पान ३ वर....



■ कर्नाटकच्या कृष्णाकाठ योजनेमुळे पश्चिम महाराष्ट्राला...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १९७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, २० डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# आश्वासने पूर्ण होणार; योजना बंद होणार नाहीत

## ...महाराष्ट्र आता थांबणार नाही - मुख्यमंत्री फडणवीस

■ लाडक्या बहिणींचा देय हप्ता अधिवेशनानंतर जमा होणार ■ शेतकऱ्यांना वीज बील नाही



● नागपूर, नितीन देवळेकर :

**राज्यातील शेतकरी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, वंचित घटकाला दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील. शासनाच्या सुरु असलेल्या योजना बंद होऊ देणार नाही, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला दिला. राज्यातील लाडक्या बहिणींना त्यांचा देय हप्ता अधिवेशन संपल्यावर देण्यात येईल, अशी ग्वाही देत महाराष्ट्र कालही नंबर एक होता, आजही नंबर एक आहे आणि उद्याही नंबर एकच राहील, महाराष्ट्राशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिमानाने व आत्मविश्वासाने विधानसभेत स्पष्ट केले.**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा छत्रपती शिवाजी महाराजांनी दिला. त्यानंतर केंद्रातील मोदी सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा संविधानानुसार दिला. यामुळे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी निधी मिळणार आहे. तसेच विद्वानांना दोन पुरस्कार मिळणार आहेत. प्राचिन ग्रंथांचा अनुवाद करण्यात येणार आहे. या सर्व प्रयत्नांसह आपण आपली भाषा रूजविणार आहोत. आता न्यायालयाती निवाडे मराठीत उपलब्ध करण्यास सुरूवात होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी गेल्या अडिच वर्षात १६७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून यामुळे २५.२१ लक्ष हेक्टर जमिन सिंचनाखील येणार आहे. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प आम्ही केला असून नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवार योजना आणि जलसिंचन प्रकल्प यासाठी उपयुक्त आहे. वैनगंगा-नळगंगा, नारपार-गिरणा, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे असे नदी जोडप्रकल्प मार्गी लावणार असल्याने विकासाला गती मिळणार आहे. पान २ वर

### महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात १ जुलै २०२२ पासून ३ लाख ४८ हजार ७० कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आली असून यामुळे २ लाख १३ हजार २६७ इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात १० मोठ्या प्रकल्पांना आपण मंजूरी दिली असून यामध्ये २ लाख ३९ हजार ११७ कोटींची गुंतवणूक तर ७९ हजार ७२० इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. विदर्भातील ४७ मोठ्या प्रकल्पात १ लाख २३ हजार ९३१ कोटींची गुंतवणूक होऊन ६१ हजार रोजगार निर्मिती, मराठवाड्यात ३८ प्रकल्पात ७४ हजार ६४६ कोटी गुंतवणूक व ४१ हजार ३२५ रोजगार निर्मिती आणि उर्वरित महाराष्ट्रात १३६ प्रकल्पात १ लाख ४९ हजार ४९३ कोटींची गुंतवणूक होऊन १ लाख १० हजार ५८८ रोजगार निर्मिती होत आहे. यामुळे महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. छ. संभाजीनगर, जालना या ठिकाणी देखील उद्योगाचे जाळे विकसित होत आहे. राज्यात वसुलीबाजांना थारा दिला नाही तर राज्याच्या प्रगतीचा वेग दुप्पट होईल. अशा वसुलीबाजांवर आता कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## () थोडक्यात ()



### कुर्ला बेस्ट अपघातातील आणखी एका जखमीचा मृत्यू, मृतांची संख्या नऊ

**मुंबई :** कुर्ला परिसरात बेस्ट बसच्या भीषण अपघातात जखमी झालेल्या आणखी एका व्यक्तीचा गुरुवारी मृत्यू झाला. त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या नऊ झाली आहे. मृताचे नाव मेहताब शेख (२२) असे आहे.

कुर्ला पेश्चिम येथील महापालिकेच्या एल विभाग कार्यालयासमोर गेल्या सोमवारी ९ डिसेंबर रोजी रात्री १० च्या सुमारास भीषण अपघात झाला होता. भरधाव वेगात धावणाऱ्या बेस्टच्या बसने अनेक पादचारी व वाहनांना धडक दिली. या अपघातामध्ये ४९ जण जखमी झाले होते.

त्यापैकी सात जणांचा मृत्यू झाला होता. जखमींपैकी शीव रुग्णालयात दाखल असलेल्या आणखी एकाचा सोमवार, १६ डिसेंबर रोजी मृत्यू झाला. तर आणखी एका तरुणाचा गुरुवार, १८ डिसेंबर रोजी मृत्यू झाला. बेस्ट बसच्या भीषण अपघातातील मृतांची संख्या नऊ झाली आहे.

### विधानपरिषदेच्या सभापतीपदी प्रा. राम शिंदे यांची निवड




**नागपूर :** विधानपरिषदेच्या १९ व्या सभापतीपदी प्रा. राम शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे प्रा. राम शिंदे यांना सभापतीच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेवून गेले.

विधानपरिषदेच्या सभापतीपदी विधानपरिषद सदस्य प्रा. राम शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव सदस्य श्रीकांत भारतीय, उमा खापरे व शिवाजीराव गर्जे यांनी मांडला. त्यास सदस्य मनीषा कायंदे, सदस्य अमोल मिटकरी व सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अनुमोदन दिले. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रा. राम शिंदे यांचा परिचय करून दिला.

## विरार मध्ये अल्पवयीन मुलीचा रस्त्यात विनयभंग

● वसई, सुचिता सोनावणे:




विरार मध्ये भर रस्त्यात १४ वर्षीय मुलीचा अनोळखी तरुणाकडून विनयभंग केल्याची घटना घडली आहे. यामुळे स्थानिकांमध्ये घबराट पसरली आहे. अल्पवयीन मुलींना अडवून त्यांच्यावर लैंगिक अत्यातार करणारे विकृत म्हणजेच सिरियल मॉलेस्टर पुन्हा सक्रीय झाल्याची शक्यता स्थानिकांनी वर्तवली आहे. सध्या बोळींज पोलीस सीसीटीव्हीच्या आधारे या विकृताचा शोध घेत आहेत. विरार पश्चिमेला राहणारी एक १४ वर्षांची मुलगी शालेय साहित्य घेण्यासाठी दुकानात गेली होती. पान २ वर

## उरणमधील दोन हजार हेक्टर जमीन समुद्राच्या भरतीमुळे धोक्यात ?

### खाऱ्या पाण्यामुळे शेती नापिकीच्या मार्गावर

● उरण, भावना जैन :

समुद्र किनाऱ्यावरील शेतीचे समुद्राच्या भरतीपासून संरक्षण करणारी बांधबंदिस्ती कमजोर झाली आहे. या नादुरुस्त बांधाना समुद्राच्या भरतीच्या वेळी भेगा (खांडी) जाऊन येथील भात शेतीत पाणी शिरू लागले आहे. याकडे शासनाच्या खार बंदिस्तीकडे खारलँड विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे जमिनी नापिकी होण्याची शक्यता वाढली आहे. या बांधालगतच्या दोन हजार हेक्टर जमिनी धोक्यात



आल्या आहेत. या जमिनीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे. उरण तालुका हा शेतीसाठी प्रसिद्ध होता. पान २ वर

## सीआयडी पोलिस महासंचालक करणार संतोष देशमुख हत्येच्या प्रकरणाची चौकशी

● बीड, सचिन कदम :



राज्यात गेल्या काही दिवसांपासून गाजत असलेल्या मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी आता मोठी बातमी समोर आली आहे. या प्रकरणाचा तपास आता वरिष्ठ पातळीवर होणार आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सीआयडीचे पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणार आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी सकाळी ११ वाजता विधानसभेत सविस्तर निवेदन सादर करणार असल्याची माहिती आहे.

## स्मृती मंदिर परिसरात भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांची दांडी..



● नागपूर, नितीन देवळेकर :

विधी मंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजप व शिंदे गटाच्या बहुतांश आमदारांनी गुरुवारी रेशीमबागेतील स्मृती मंदिराला भेट दिली मात्र भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांनी मात्र स्मृती मंदिर परिसरात दांडी मारली.

शिवाय आशिष देशमुख. शिंदे गटाचे निलेश राणे यांनी मारलेल्या दांडीची चर्चा परिसरात अधिक रंगली. विधी मंडळाचे हिवाळी अधिवेशनाच्या काळात दरवर्षी भाजपचे सदस्य स्मृती मंदिर परिसर भेट देत असतात. यावर्षी भाजपसह महायुतीच्या सर्व आमदारांना अधिवेशन सुरू पत्र देत निमंत्रण देण्यात आले होते. पान २ वर

## मुंबई काँग्रेसभवन बाहेर भाजपाचे आंदोलन, पोलीसांचा लाठीचार्ज

● मुंबई, यश सावंत :

मुंबईत काँग्रेस विरोधात भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. मुंबईतील किल्ला कोर्टच्या समोर असलेल्या काँग्रेस कार्यालयाची भाजपच्या कार्यकर्त्यांकडून तोडफोड करण्यात आली आहे. भाजप युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष तेजिंदर सिंग तिवाना यांच्या




नेतृत्वाखाली काँग्रेस विरोधात तीव्र आंदोलन सुरु करण्यात आले होते.

त्यावेळी हा प्रकार घडलाय. मुंबईत भाजप कार्यकर्ते काँग्रेसच्या कार्यालयात घुसले त्यानंतर पोलिसांनाही मारहाण केलीये. भाजप युवा मोर्चा कडून मुंबईत किल्ला कोर्टाच्या समोर काँग्रेस कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये भाजप कार्यकर्ता आक्रमक होत काँग्रेस कार्यालयाची तोडफोड केली. सोबत राहुल गांधी सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या पोस्टरवर काळी शाही फेकली. पान २ वर

## कल्याण तहसीलदार कार्यालयातील महसूल सहाय्यक शेतकऱ्याकडून लाच घेताना अटक

● कल्याण, गणेश बागडे :


कल्याण तालुक्यातील रायते येथील एका जमीन खरेदी प्रकरणात जमीन मालक शेतकऱ्याकडून ४० हजार रूपयांची लाच घेताना येथील तहसीलदार कार्यालयातील एका महसूल साहाय्यकाला बुधवारी संध्याकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. संतोष महादेव पाटील (४६) असे लाच घेताना पकडलेल्या महसूल साहाय्यकाचे नाव आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक गजानन राठोड, संजय गोवीलकर, पोलीस निरीक्षक रूपाली पोळ यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक रूपाली पोळ यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यातील तक्रारीत दिलेली माहिती अशी, तक्रारदार शेतकरी यांनी कल्याण तालुक्यातील रायते गावी दहा गुंठे जमीन खरेदी केली आहे. पान २ वर



## कुलाबा ते बीकेसी मेट्रो ३ चा प्रवास 'मे २०२५' पासून प्रवासासाठी खुला होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबईतील पहिल्या 'कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेवरील आरे – बीकेसीदरम्यानचा पहिला टप्पा ७ ऑक्टोबर रोजी वाहतूक सेवेत दाखल झाला. आता कुलाबा ते बीकेसीपर्यंतचा दुसरा टप्पा मे २०२५ पर्यंत खुला होणार असल्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिलं. 'कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो ३' मुंबईतील ही पहिलीच भुयारी मेट्रो. या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्याला चांगला प्रतिसाद




मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र ही अपेक्षा फोल ठरली. एकीकडे प्रवाशांचा म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसतानाच दुसरीकडे हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल झाल्यापासून तांत्रिक अडचणींची मालिका सुरूच होती. पान २ वर

### पहिल्या टप्प्याकडे प्रवाशांची पाठ

■ एमएमआरसीकडून ३३.५ किमीच्या भुयारी मेट्रो ३ मार्गिकेचे बांधकाम केले जात आहे. या ३३.५ किमीमधील १२.५ किमी लांबीचा आरे ते बीकेसी असा टप्पा ७ ऑक्टोबरपासून वाहतूक सेवा सुरू झाली आहे. मुंबईतील ही पहिली भुयारी मेट्रो मार्गिका असल्याने आणि उपनगरीय रेल्वे सेवा पोहोचत नाही अशा भागांना ही मेट्रो जोडत असल्याने या मार्गिकेला चांगला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. प्रत्यक्षात आरे ते बीकेसी टप्प्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही.

## ठाकरे गटाचे पराभूत उमेदवार अमोल किर्तीकरांची याचिका उच्च न्यायालयानं फेटाळून लावली

● मुंबई, विशाल पाटील :



उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघाबाबत दिलेल्या निकालाच्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार अमोल कीर्तीकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याची उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांचा ४८ मतांनी विजय झाला होता. तर अमोल कीर्तीकर यांना पराभव स्वीकाराला लागला होता. मतमोजणी प्रक्रियेत गोंधळ झाल्याची तक्रार अमोल कीर्तीकर यांनी निवडणूक आयोगाकडे केली होती. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याचिका आता मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. पान २ वर

## संपादकीय


# भारतातील मानसिक आरोग्याचे धोरण आणि कायदे

जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार मानसिक आरोग्यामध्ये भावनिक, मनोवैज्ञानिक आणि सामाजिक कल्याण यांचा समावेश होतो, ज्याचा आकलनशक्ती, धारणा आणि वर्तन यांवर परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटने (डब्ल्यूएचओ) च्या मते, ही एक 'कल्याणाची स्थिती आहे ज्यामध्ये व्यक्तीला तिच्या क्षमतांची जाणीव होते. ती तिच्या जीवनातील सामान्य ताणतणावांचा सामना करू शकते. उत्पादक आणि फलदायीपणे कार्य करू शकते आणि तिचा समुदाय, तसेच व्यक्तिगत पातळीवर एखादी व्यक्ती तणाव, परस्पर संबंध आणि निर्णय घेण्याची क्षमता कशी हाताळते हे देखील ते ठरवते.

भारतामध्ये मानसिक आरोग्य धोरण आणि कायद्याचा प्रवास हा टप्प्याटप्प्याने प्रगती करत आलेला आहे. या प्रवासाची सुरुवात १९ व्या शतकात झाली, जेव्हा ब्रिटीश कालखंडात काही मानसिक आरोग्य संस्थांची स्थापना झाली. १८९७ साली लागू झालेला इंडियन लुनासी ॲक्ट हा कायदा मानसिक रुग्णांसाठी प्रथमच व्यवस्थात्मक दृष्टीकोन मांडणारा कायदा होता. मात्र, हा कायदा आजच्या दृष्टिकोनातून मागासलेला आणि अपुरा वाटतो. मात्र, त्या काळातील मानसिक आरोग्य व्यवस्थापन हे रुग्णांना वेगळे ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत होते. हा कायदा रुग्णांना 'लूनाटिक' म्हणजेच वेडसर म्हणून वर्गीकृत करत असे. यामध्ये रुग्णांच्या कल्याणापेक्षा नियंत्रणाला प्राधान्य होते. या कायद्याचा उद्देश हा मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना ओळखणे आणि त्यांना वेगळे ठेवण्यासाठी नियामक व्यवस्था तयार करणे हा होता. तसेच मानसिक रुग्णांसाठी आश्रयगृहांची स्थापना करणे आणि त्यांचे प्रशासन ठरवणे आणि मानसिक आजारग्रस्त व्यक्तींवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांना समाजापासून विलग करणे हा होता. या कायद्याचा परिणाम असा झाला की मानसिक आरोग्यासाठी मूलभूत वैधानिक चौकट उपलब्ध झाली, परंतु ती मुख्यतः संस्थात्मक नियंत्रणावर आधारित होती. मानसिक आरोग्यासंबंधी कलंक आणि नकारात्मकता वाढीस लागली. तसेच उपचारांची मर्यादा, पायाभूत सुविधा, आणि रुग्णांचे अधिकार याकडे दुर्लक्ष झाले.

भारतातील मानसिक आरोग्य क्षेत्राच्या ऐतिहासिक प्रवासाचा हा कायदा एक महत्त्वाचा टप्पा मानला जाऊ शकतो, जो मानसिक आरोग्याच्या सध्याच्या प्रगत धोरणांसाठी शिकवण ठरला आहे. १८९७ चा इंडियन लुनासी ॲक्ट हा काळाच्या संदर्भात मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी पहिला टप्पा ठरला असला, तरी तो उपचारांपेक्षा विलगीकरणावर आधारित होता. हा कायदा मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी योग्य दिशादर्शक ठरला नाही. यावर आधारित अनुभव आणि चुका लक्षात घेऊन पुढे १९८७ आणि २०१७ चे कायदे अधिक सुस्पष्ट आणि मानवतावादी दृष्टिकोनात तयार करण्यात आले, १९८७ चा मानसिक आरोग्य कायदा १९८७ चा मेंटल हेल्थ ॲक्ट हा भारतात मानसिक आरोग्यासाठी लागू केलेला पहिला व्यापक कायदा होता. या कायद्याचा उद्देश मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना त्यांच्या उपचारांसाठी योग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हा होता. याने १८९७ च्या इंडियन लुनासी ॲक्टची जागा घेतली, जो रुग्णांच्या हक्कांपेक्षा नियंत्रणावर अधिक भर देत असे. या कायद्यात मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या उपचारांसाठी सुधारित आणि अधिक मानवीय दृष्टीकोन प्रदान करण्यात आला. तसेच मानसिक आरोग्य संस्थांमध्ये रुग्णांच्या प्रवेश, उपचार, आणि सुटकेसाठी निश्चित प्रक्रिया तयार करण्यात आली. य कायद्याद्वारे मानसिक रुग्णांचे हक्क संरक्षित करण्यात आले आणि त्यांचे व्यक्तीचे कुठलाही प्रकारे शोषण होणार नाही याची उपाययोजना करण्यात आली. मानसिक रुग्णांना मानवी हक्क मिळावेत, यावर भर

# कर्मयोगी संत गाडगे महाराज



महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६८ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे**

## पान १ वरून...

### विरार मध्ये अल्पवयीन...

रात्री ९ च्या सुमारास एका अनोळखी तरुणाने तिला रस्त्यात अडवून तिचा विनयभंग केला. या प्रकारामुळे मुलगी प्रचंड घाबरली होती. अखेर तिने आईला हा प्रकार सांगितला. आईने तात्काळ विरारच्या बोळींज पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्याच्या विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

हा अनोळखी तरुण २० ते २२ वर्षांचा आहे. त्याने तोंडाला रुमाल बांधला होता. आम्ही परिसरातील सीसीटीव्ही तपासून आरोपीचा शोध घेत असल्याची माहिती बोळींज पोलिसांनी दिली.

पुन्हा सिरियल मॉलेस्टरची दहशत?

या घटनेमुळे परिसरातील पालक आणि मुलींमध्ये भीती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही महिन्यांपूर्वी अल्पवयीन मुलींना रस्त्यात अडवून त्यांचा विनयभंग करणारे सिरियल मॉलेस्टर (विकृत) सक्रीय झाले होते. हा तसाच प्रकार असल्याची शक्यता स्थानिकांनी वर्तवली आहे. पोलिसांनी मात्र ती शक्यता फेटाळून लावली आहे. सध्या एकच तक्रार प्राप्त झाली आहे. अन्य ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे घडल्यावर त्याला सिरियल मॉलेस्टर म्हटले जाईल असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

मागील वर्षा नालासोपारा शहरामध्ये सध्या शाळकरी मुलींना रस्त्यात अडवून तसेच घराबाहेर खेळणाऱ्या चिमुलकल्या मुलींना आडोशाला नेऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केल्याच्या घडल्या होत्या. या प्रकरणी तुळींज पोलिसांमध्ये दोन वेगवेगळ्या घटनांबाबत गुन्हे दाखल करण्यात आले होते. २०१८ मध्ये देखील अशाच नालासोपारा शहरात अशाच एका विकृाची (सिरियल रेपिस्ट) दहशत पसरली होती. रेहान कुरेशी नावाचा विकृत रस्त्यात शाळकरी मुलींना अडवून त्यांना आडमार्गाला नेऊन विनयभंग तसेच बलात्कार करत होता. नालासोपाऱ्यातील अनेक मुलींवर त्याने अशा प्रकारे अत्याचार केले होते. मात्र फक्त ३ मुलींनी तक्रारी दिल्या होत्या. मुंबई, नवी मुंबई ठाणे,मीर रोड, भाईंदर येथील २०० हून अधिक मुलींवर त्याने अशाप्रकारे लैंगिक अत्याचार केल्याची उघड झाले होते.होते. दोन वर्षे त्याची दशहत होती. नंतर त्याला गुन्हे शाखेने अटक केली होती.

### आश्वासने पूर्ण होणार;योजना...

राज्यातील शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी, शेतकऱ्यांच्या पिकाला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी नदीजोड प्रकल्प महत्वाचे आहेत. यासाठी राज्य शासनाने जल आराखडा तयार केला आहे. राज्यात बांब लागवडीला प्रोत्साहन देण्यात असून यामुळे

महाराष्ट्र आता थांबणार नाही...

सोबत राहू एकदिलाने, घडवू महाराष्ट्र पुन्हा नव्याने, समृद्धीचा वेग कुणी रोखणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...

उद्योग, गुंतवणूक येतेय जोमात बेरोजगारांना देऊ रोजगाराची साथ तरुणाईचं स्वप्न कधी भंगणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...

रस्ते, पूल, रेल्वेचे धागे, सुखदायी प्रवासाचे स्वप्न होईल जागे, गतीला स्थगिती मिळणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...

विकासाच्या स्वप्नांसोबत सेतू अटल मुंबईच्या वेगासाठी आहे कोस्टल मराठी माणसाचे स्वप्न भंगणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...

जलयुक्त शिवार देईल नवजीवन, नदीजोड प्रकल्प फुलवतील नंदनवन राज्यात दुष्काळ कुठे दिसणार नाही महाराष्ट्र आता थांबणार नाही...

पाणंद रस्त्यांनी जोडू शेतशिवार आनंदाचा शिधा देईल आधार उपाशी पोटी कुणी झोपणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...

लाडक्या बहिणींना मिळाला स्वाभिमान ज्येष्ठांना मोफत प्रवासातून सन्मान लाडक्या लेकी कधी दुःखी होणार नाही अन् महाराष्ट्र आता थांबणार नाही...

असेल विरोधकांचे कमी संख्याबळ, सारे टिकवून ठेऊ लोकशाहीचे बळ कोणत्याही आमदाराचा मानसन्मान घटणार नाही महाराष्ट्र आता थांबणार नाही...

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### उरणमधील दोन हजार हेक्टर...

मात्र गेल्या पन्नास वर्षांत हजारो एकर जमिनी केंद्र व राज्य सरकारच्या औद्योगिक प्रकल्प, बंदर आणि खासगी उद्योग यासाठी जमिनी संपादीत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे उरणमधील शेतीखालील जमिनी कमी झाल्या आहेत. असे असले तरी उरणच्या नागाव,केगाव व चाणजे तसेच उरण पूर्व विभागातील खोपटे, कोप्रोली, चिरनेर, आवरे, गोवठाणे, वशेणी, पुनाडे, धुतुम, बोरखार, मोठी जुई आदी खाडी किनारची जमीन भात पीकाखाली आहे. मात्र या जमिनीच्या परिसरात येणाऱ्या समुद्राच्या भरतीच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी असलेल्या नैसर्गिक वाटा बंद किंवा बुजविण्यात येत आहेत. त्यामुळे शेतीच्या सुरक्षेसाठी बांधण्यात आलेले बांध नादुरुस्त होऊन भात शेतीत पाणी शिरू लागले आहे. यात खोपटे,मोठीजुई,बोरखार परिसरातील शेतीत पाणी शिरून शेतीचे नुकसान होत आहे.

या जमिनीचे समुद्राच्या भरतीच्या पासून संरक्षण करण्याची जबाबदारी खारलँड विभागाची आहे. उरण तालुका हा खारलँड विभागाच्या पेण परिक्षेत्रात मोडतो. त्यामुळे या विभागाची जबाबदारी खारलँड विभागाची आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

काँग्रेसने नेहमी संविधानाचा अपमान केलाय. काँग्रेसने आंबेडकरांचा निवडणुकीत पराभव करण्यासाठी प्रयत्न केले होते, असं म्हणत भाजप कार्यकर्ते काँग्रेसच्या कार्यालयात घुसले आणि त्यानंतर तोडफोड देखील करण्यात आली आहे. दरम्यान, कार्यकर्ते आक्रमक झाल्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज करत आंदोलन पांगवण्याच प्रयत्न केला आहे.

भाजप कार्यकर्त्यांची काँग्रेस कार्यालयाबाहेर घोषणाबाजी

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर विरोधकांनी देशभरात निषेध आंदोलन सुरु केले आहे. यालाच उत्तर देण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी काँग्रेस कार्यालयाबाहेर जात घोषणाबाजी केली आहे. शिवाय शाईफेक देखील करण्यात आली आहे. दरम्यान, आंदोलकांना पांगवल्यानंतर काँग्रेस कार्यालय उघडून पोलीस आतमध्ये किती नुकसान झालंय याच्या पाहणीसाठी आले आहेत.

### कल्याण तहसीलदार...

या जमिनीचा सातबारा उतारा आणि फेरफार स्वताच्या नावे नोंद होण्यासाठी तक्रारदार शेतकरी महसूल कार्यालयात प्रयत्नशील होता. सातबारा, फेरफार नोंद होण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जमीन खरेदीदार शेतकऱ्याकडे शेतकरी असल्याचा तहसीलदारांचा दाखला आवश्यक होता. त्याशिवाय ही नोंद होणार नाही असे खरेदीदाराला महसूल विभागाने कळविले होते.

खरेदीदार शेतकऱ्याने या दाखल्यासाठी आपल्या मूळ गावी असलेल्या उत्तरप्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील केराकत तहसीलदारांचा दाखला मिळण्याची मागणी त्या कार्यालयाकडे केली होती. त्याप्रमाणे तो दाखल कल्याण तहसीलदार कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. जमीन खरेदीदार शेतकऱ्याची शेतकरी दाखल्यासह सातबारा सदरी नोंद होण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असा प्रस्ताव रायते तलाठी यांना पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तहसीलदार कार्यालयातील महसूल साहाय्यक संतोष पाटील यांनी तक्रारदाराकडे चाळीस हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही आपल्याकडे पैसे मागितले जात असल्याने जमीन खरेदीदार शेतकऱ्याने याप्रकरणी गेल्या शनिवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे विभागाकडे तक्रार केली.

या तक्रारीप्रमाणे मंगळवारी तक्रारीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने पंचांसमक्ष पडताळणी केली. या पडताळणीत महसूल साहाय्यक स्वतासाठी २० हजार आणि वरिष्ठांसाठी २० हजार रूपये मागत असल्याचे निष्पन्न झाले.बुधवारी संध्याकाळी लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे शेतकऱ्याने महसूल साहाय्यक पाटील यांना लाचेची रक्कम देण्याचे कबुल केले. कल्याण तहसीलदार कार्यालयातील महसूल साहाय्यक कक्षाच्या

# एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल पब्लिक स्कूल शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु

**पालघर (सुचिता सोनावणे) :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार जि. पालघर अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी एकलव्य मॉडेल रेसिडेंसियल पब्लिक स्कुल प्रवेश पुर्व अर्ज घेण्याचे आयुक्त, तथा सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक द्वारा आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी प्रस्तावित केलेले आहे. राज्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत कार्यान्वित इंग्रजी माध्यमाच्या सर्व एकलव्य मॉडेल रेसिडेसियल पब्लिक स्कुल मधील इयत्ता सहावीच्या वर्गात नियमित प्रवेश तसेच इयत्ता सातवी ते नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या रिक्त जागांचा अनुशेष भरण्याकरीता अनुसुचित/आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांकडुन ऑफलाईन पध्दत्तीने अर्ज मागविण्यात येत असुन सदर प्रवेश अर्ज या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील जवळच्या शासकीय आश्रमशाळेवर उपलब्ध आहेत. प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांच्या पालकांनी सदर आवेदन पत्र सांक्षाकित कागदपत्रासह या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील जवळच्या शासकीय आश्रमशाळेवर जमा करण्याची अंतिम मुदत ०१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत राहणार आहे. अर्ज जमा करतांना कागदपत्र जोडावयाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

ज्या अनुसुचित/आदिम जमातीच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न सरासरी ६ लक्ष पेक्षा कमी असावे. त्याबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला सोबत जोडण्यात यावा. ( जात प्रमाणपत्रासह उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.)

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शिक्षण घेत असलेल्या




विद्यार्थ्यांचे प्रथमसत्र गुणपत्रक जोडणे आवश्यक आहे.

एकलव्य मॉडेल रेसिडेसियल पब्लिक स्कुलमध्ये इयत्ता ६ वीच्या वर्गात एकूण ६० विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीनुसार व गुणानुक्रमे प्रवेश देण्यात येईल. सर्व शासकीय/ अनुदानित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दिनांकास परीक्षा केंद्रावर सुरक्षितपणे घेवुन जाण्याची व्यवस्था करावी. त्यासाठी येणारा प्रवासखर्च आश्रमशाळेच्या आस्थापनेवरुन करण्यात यावा. जि.प. व इतर शासन मान्य प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अनुसुचित/ आदिम जमातीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर घेवुन जाण्याची जबाबदारी त्यांच्या पालकांची/ शिक्षकांची राहील. छाननीअंती प्रात्र झालेले प्रवेश अर्ज धारक विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येईल. पालकांनी आपल्या अर्जामध्ये पाल्यांना एकलव्य मॉडेल रेसिडेंसियल पब्लिक स्कुल करीता प्राधान्यक्रम देता येईल. व त्यानुसार निवड झाल्यास त्याच प्राधान्यक्रमाने एकलव्य मॉडेल रेसिडेंसियल पब्लिक स्कुल मध्ये प्रवेश देण्यात येईल.

विद्यार्थ्यांला ज्या इयत्तेमध्ये प्रवेश घ्यायचा असेल त्याची अचुक नोंद अर्जामध्ये करावी. विद्यार्थी आदिम जमातीमधील असेल असे नमुद करावे. विद्यार्थ्यांचा फॉर्म भरतेवेळी आवेदन पत्रामध्ये दिलेला संपर्क / मोबाईल क्रमांक अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांची जन्म तारीखेची अचुक नोंद घेण्यात यावी. (शाळेतील रजिस्टरमधील नोंदीनुसार) दाखला जोडणे आवश्यक आहे.प्रवेश अर्जामध्ये नमुद प्रमाणपत्रावर मुख्याध्यापकांची स्वाक्षरी/ शिक्का/नांव असणे अनिवार्य आहे. अन्यथा अर्ज स्विकारण्यात येणार नाही.प्रवेश प्रक्रीयेसंदर्भात अंतिम निर्णय घेण्याचे सर्वाधिकार, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी, नाशिक या संस्थेस राहील.फॉर्म भरण्याची अंतिम मुदत ०१ फेब्रुवारी २०२५ आहे. अंतिम मुदतीनंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाही. इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावे असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा जव्हार प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प करिश्मा नायर यांनी केले आहे.

# मालमत्ता कर संकलन केंद्रे सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार

**ठाणे (रोहित जैसवाल) :** सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही अंतिम टप्प्यात सुरू आहे. या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे करदाते/ नागरिक त्यांचा मालमत्ता कर प्रत्यक्ष प्रभाग कार्यालयात येऊन भरतात अशा करदात्यांना सोईचे व्हावे या करिता ठाणे महापालिकेची सर्व कर संकलन केंद्रे सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार आहेत. ज्या करदात्यांनी आपला मालमत्ता कर अद्याप जमा केलेला नसल्यास मालमत्ता करवसुली अंतर्गतची अप्रिय कारवाई टाळण्याच्या दृष्टिकोनातून आपला मालमत्ता कर भरुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

ठाणे महानगरपालिकेची सर्व प्रभाग व उप प्रभाग स्तरावरील सर्व कर संकलन केंद्रे व प्रभाग स्तरावरील कर वसुली कार्यालये तसेच महापालिका प्रशासकीय




भवनातील मुख्य करवसुली कार्यालय व नागरी सुविधा केंद्रातील कर संकलन केंद्र दि. ०१.१२.२०२४ ते ३१.१२.२०२४ या कालावधीतील सर्व शनिवार सकाळी १०.३० ते सायं. ४.३० वाजेपर्यत तसेच दि. ०१.०१.२०२५ ते ३१.०३.२०२५ या कालावधीमधील सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी (दि. १४ मार्च २०२५ रोजी धुलीवंदन असल्याने हा दिवस वगळून) सकाळी १०.३० ते सायं. ४.३० आणि तसेच सर्व रविवार सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत कर संकलनासाठी कार्यान्वित राहणार आहेत.

महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावरुन Payment Gateway द्वारे ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर जमा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच गुगल पे, फोन पे, पेटीएम, भीम ॲप द्वारे देखील करदाते मालमत्ता कर सुलभतेने जमा करु शकतील. तरी नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरण्यासाठी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## भिवंडी महानगरपालिकेकडून श्वान दंशावरील Inj.A.R.V.(Anti Rabies Vaccine) नागरिकांसाठी उपलब्ध


**भिवंडी (यश सावंत) -** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महानगरपालिकास्तरावरून महानगरपालिकेच्या बीजीपी दवाखाना (सध्याचा पत्ता सोनापूर मस्जिद, बंगालपूरा, भिवंडी) येथे व शासनस्तरावरून शासनाच्या स्व. इंदिरा गांधी स्मृति उपजिल्हा रूग्णालय, भिवंडी येथे श्वान दंशावरील रूग्णांसाठी Inj. A.R.V. (Anti Rabies Vaccine) उपलब्ध आहेत.

मात्र सद्यःस्थितीत भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये श्वान दंशावरील रूग्णसंख्येत वाढ झालेली असल्याचे निदर्शनास आल्यामुळे श्वान दंशावरील रूग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य सो., भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांचे आदेशानुसार महानगरपालिकेच्या नवीवस्ती नागरी आरोग्य केंद्र (पत्ता- मनपा शाळा क्र. ८७, पाण्याची टाकी नवीवस्ती, भिवंडी) येथे महानगरपालिकास्तरावरून श्वान दंशावरील Inj. A.R.V. (Anti Rabies Vaccine) उपलब्ध करणेत आलेले आहे.

तरी श्वानदंश केलेल्या जास्तीत-जास्त रूग्णांनी याचा लाभ घ्यावा व सदरचा संदेश आपल्या आस-पासच्या नागरीकांना व आपल्या मित्र मंडळी यांना द्यावा. असे आवाहन महानगरपालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य व डॉ. संदिप गाडेकर, वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी नागरीकांना केले आहे.

## खादी संस्कृतीचा भाग व्हावा!- डॉ.विजय बेडेकर

**ठाणे (सम्यक कासारे) -** "खादी हे केवळ वस्त्र नसून तो एक विचार आहे.खादी संस्कृतीचा भाग व्हायला हवी, असे मत विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.विजय बेडेकर यांनी व्यक्त केले. खादी प्रदर्शनाचे व नवरंग सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन करताना ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक , उत्तम जोशी, नवरंग प्रमुख डॉ.प्रियंवदा टोकेकर , डॉ.महेश पाटील, प्रा.सुभाष शिंदे, प्रा.नारायण बारसे, रमेश सुरंगे. डॉ. नितीन जोशी, खादी सेमिनारच्या प्रमुख डॉ संगीता दास, प्रा.अंजली पुरंदरे,प्रा. माधवी जोशी इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी



प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांनी रंगाचे उत्सवासोबत असलेले नाते अधोरेखित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या," रंगांचा प्रवृत्तीशी संबंध आहे. रंगावलीचे खूप रंग आहेत. मकर संक्रांतीच्या सणाला तर काळ्या रंगाचे एक

# सिटी पारेख सीएनजी पेट्रॉलपंपावर झाली आगीची रंगीत तालिम



**पालघर (सतीश सोनावणे) -** आज दिनांक १९.१२.२०२४ रोजी गुजरात गॅस लिमीटेड यांच्या मार्फत पालघर शहरातील सिटी पारेख CNG पेट्रॉलपंपावर सकाळी १०.४५ च्या दरम्यान गाडीतील गॅसचा बाटला पेट घेतल्याने जिल्ह्यातील संबंधित यंत्रणा तात्काळ त्या ठिकाणी हजर झाले. अग्नीशमन दलाने सदरची आग विझवण्यात यश मिळवले. जखमी झालेल्या लोकांना प्रथमोपचार देऊन तात्काळ रुग्णवाहीकेव्दारे रुग्णालयात दाखल करण्यात सुयोग्य व्यवस्थापन करण्यात आले. तसेच सदर रंगीत तालीमचे नियंत्रण जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत करण्यात आले. अशा प्रमाणे रंगीत तालीम संपन्न झाली सदर रंगीत तालीमेत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विवेकानंद कदम, पोलीस निरिक्षक अनंत पराड, पोलीस उपनिरिक्षक बालाजी मुंडे, आयटी साहय्यक विक्रांत दांडेकर, गुजरात गॅस लिमीटेडचे सर्कल हेड श्री. भावेश दवे व शिवकुमार आणि त्यांची टिम, आरोग्य विभाग, अग्नीशमन

## कोकण संस्था आणि मास्टेक फाऊंडेशन यांच्यातर्फे पोचाडे येथे शिवण प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ



# दोन वर्षांपूर्वी केलं आंतरधर्मीय लग्न; अभिनेत्रीच्या घरी चिमुकल्या सदस्याचं आगमन






टीव्ही अभिनेत्री श्रद्धा आर्या, सना सय्यद, अदिती शर्मा यांच्यानंतर आता 'साथ निभाना साथिया' फेम अभिनेत्री देवोलीना भट्टाचार्जी आई झाली आहे. अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करून बाळाच्या आगमनाची बातमी दिली आहे. देवोलीनाने लग्नानंतर दोन वर्षांनी पती शानवाजबरोबर पहिल्या बाळाचं स्वागत केलं. तिच्या बाळाचा जन्म बुधवारी (१८ डिसेंबरला) झाला.

देवोलीना भट्टाचार्जीने मुलाला जन्म दिला आहे. तिने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करून चाहत्यांना ही गुड न्यूज दिली. देवोलीना व शानवाज यांच्या घरी बुधवारी (१८ डिसेंबरला) चिमुकल्या सदस्याचं आगमन झालं आहे. देवोलीनाच्या या पोस्टवर तिचे मित्र-मैत्रिणी व चाहते कमेंट्स करून तिचं अभिनंदन करत आहेत.

देवोलीना भट्टाचार्जीने जिम ट्रेनर शानवाज शेखला काही वर्षे डेट केलं होतं, त्यानंतर हे दोघेही १४ डिसेंबर २०२२ रोजी लग्नबंधनात अडकले. दोघांनी नोंदणी पद्धतीने लग्न केलं होतं. अगदी साधेपणाने त्यांचं लग्न पार पडलं होतं. या लग्नात दोघांचे कुटुंबीय व काही जवळचे लोक उपस्थित होते. आता लग्नानंतर दोन वर्षांनी देवोलीना व शानवाज आई-बाबा झाले आहेत.

देवोलीनाने २०११ मध्ये 'सवांरे सबके सपने प्रीतो' या शोमधून अभिनयाला सुरुवात केली होती. नंतर तिने 'साथ निभाना साथिया' मध्ये गोपी ही भूमिका केली होती. या मालिकेतून तिला खूप लोकप्रियता मिळाली. देवोलीना 'बिग बॉस'चा भाग राहिली होती. देवोलीना ही एक प्रशिक्षित भरतनाट्यम नृत्यांगना आहे. देवोलीनाने 'लाल इश्क', 'साथ निभाना साथिया २' आणि 'दिल दियां गल्लां', 'छठी मैय्या की बिटिया' या शोमध्ये काम केलं आहे.

# रश्मिकासोबत प्रेमाची कबुली कधी देणार?



अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा यांच्या रिलेशनशिपच्या चर्चा नेहमीच जोर धरुन असतात. दोघांनी अजूनही त्यांचं नातं स्वीकारलेलं नाही. मात्र चाहत्यांनी अनेकदा दोघंही एकत्र असल्याचं निदर्शनास आणून दिलं आहे. कधी मालदीव्ह व्हॅकेशन तर कधी हॉटेलमध्ये डिनर करतानाचा त्यांचा फोटो व्हायरल झाला आहे. त्यांनी कायम हे नातं जगासमोरुन लपवून ठेवण्याचाच प्रयत्न केला आहे. मात्र आता विजय देवरकोंडाने या नात्याबद्दल सर्वांना कधी सांगणार याचा खुलासा केला आहे.

अनेक तरुणींचा क्रश विजय देवरकोंडा 'नॅशनल क्रश' रश्मिका मंदानावर फिदा आहे हे आता सगळ्यांनाच माहित आहे. विजयने नुकतंच बॉम्बे टाइम्सला मुलाखत दिली. यावेळी तो म्हणाला, "मी याविषयी तेव्हाच बोलेन जेव्हा मी पूर्णपणे तयार असेन. जेव्हा मला वाटेल की जगाला याबद्दल माहिती देण्याची गरज आहे आणि मी हे सगळ्यांना सांगू शकतो असं वाटेल तेव्हाच मी शेअर करेन. यासाठी काहीतरी कारण किंवा तसा प्रसंग आणि वेळ असली पाहिजे. त्या दिवशी मी आनंदाने माझ्या पद्धतीने याबद्दल सांगेन."

तो पुढे म्हणाला, "मला माहित आहे की चाहत्यांना कलाकारांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेण्याची नेहमीच उत्सुकता असते. जेव्हा तुम्ही एक पब्लिक फिगर असता तेव्हा हा तुमच्या कामाचाच भाग असतो. मला कधीच याचा दबाव वाटला नाही. मी याला एक बातमी म्हणून वाचतो. एकदाच असं झालं होतं की मला प्रतिक्रिया देण्याची गरज भासली होती. ते सोडलं तर बाकी कधीच नाही."

मध्यंतरी विजय आणि रश्मिकाच्या लग्नाच्या चर्चा सुरु होत्या. त्यावेळी त्याने इन्स्टाग्राम पोस्ट करुन या बातम्यांचं खंडन केलं होते. रश्मिका नुकतीच 'पुष्पा २' मध्ये दिसली. शिवाय तिचा 'द गर्लफ्रेंड' सिनेमाही रिलीज होत आहे. या सिनेमाच्या इंट्रोला विजयनेच आवाज दिला आहे.

# मायरा वायकुळ आगामी चित्रपटासाठी सिद्धिविनायकाच्या चरणी





टेलिव्हिजन मालिका आणि सोशल मीडियातून लोकप्रिय असलेली मायरा वायकुळ आगामी 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटात झळकणार आहे. ३१ जानेवारीला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून नावामुळे आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या अनोख्या प्रमोशनमुळे चित्रपटाच्या कथेविषयी प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. सहकुटुंब पाहता येणाऱ्या या चित्रपटाचं पहिलं पोस्टर सिद्धिविनायकाच्या चरणी प्रदर्शित करण्यात आलं. याप्रसंगी मायरा वायकुळ, चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्माते उपस्थित होते.

एसीडी कॅटचे मनीष कुमार जायसवाल आणि साहील मोशन आर्ट्सचे मंगेश देसाई यांनी 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. तर, या चित्रपटाच्या निमित्तानं मंगेश देसाई यांनी चित्रपटाच्या प्रस्तुती क्षेत्रात पदार्पण केलं आहे. किमाया प्रॉडक्शन्स आणि स्वरुप स्टुडिओज यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. महेश कुमार जायसवाल, किर्ती जायसवाल हे या चित्रपटाचे निर्माते आहेत, तर वैशाली संजू राठोड, सचिन नारकर, विकास पवार हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन संकेत माने यांचं असून संकेत माने, सुमित गिरी यांनी पटकथालेखन, सुमित गिरी यांनी संवादलेखन तर चिनार - महेश यांचं श्रवणीय संगीत दिग्दर्शन या चित्रपटाला लाभलं आहे. अल्पावधीतच जगभरात पोहचलेल्या मायरा वायकुळची या चित्रपटात मध्यवर्ती भूमिका आहे. त्याचबरोबर अभिनेत्री कल्याणी मुळये, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, अभिनेता मंगेश देसाई, कमलेश सावंत, सविता मालपेकर, प्रथमेश परब, सचिन नारकर, रेशम श्रीवर्धनकर आदी कलाकारांच्या चित्रपटात महत्वपूर्ण भूमिका आहेत. 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटात मायराच्या वाट्याला आलेली भूमिका काय आहे? सोशल मीडियावर सुरु असलेल्या पोस्टकार्डच्या प्रमोशनचा चित्रपटाशी नक्की कसला संबंध आहे? हे जाणुन घेण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंत आपल्याला अजून थोडी वाट पहावी लागणार आहे. दरम्यान, सोशल मीडियावर मायराच्या खूप चर्चा रंगलेल्या असतात.


नुकताच मायराच्या लहान भावाचा राजेशाही थाटात नामकरण सोहळा पार पडला. या सोहळ्याचे फोटोही सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. मायराच्या युट्यूब चॅनलवर तिचा लहान भाऊ व्योम याच्या नामकरण सोहळ्याचा व्हिडीओ शेअर करण्यात आला होता. मायरानं 'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेतून इंडस्ट्रीत पदार्पण केलं होतं.

# फक्त एक किसींग सीन कार्तिक आर्यनसाठी ठरला डोकेदुखी



बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यनने दमदार अभिनयाच्या जोरावर इंडस्ट्रीत स्वत: चं हक्काचं स्थान निर्माण केलं आहे. अलिकडेच त्याचा 'भुलभूलैय्या ३' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटात महत्वाची भूमिका निभावणारा कार्तिक आर्यन गेल्या काही दिवसांपासून मोठ्या चर्चेत आहे. कार्तिकने त्याच्या फिल्मी करिअरमध्ये बऱ्याच रोमॅंटिक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. त्यामध्ये अभिनेत्याने रोमॅंटिक सीन्स देखील दिले आहेत. परंतु एक चित्रपटामध्ये कार्तिक आर्यनची किसींग सीनमुळे डोकेदुखी वाढली होती. फक्त एका किसीन सीनसाठी त्याला ३७ रिटेक द्यावे लागले होते. याचा खुलासा अभिनेत्याने एका मुलाखतीत केला होता.

'फिल्मफेअर'मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत कार्तिक आर्यनला 'कांची : द अनब्रेकेबल' या चित्रपटातील किसींग सीनबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. या चित्रपटात




## बजेट कमी असूनही

# जितेंद्र, हृतिक रोशनच्या वडिलांबरोबर ४१ वर्षे जुन्या गाण्यावर थिरकले



चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांनी नुकताच त्यांच्या लग्नाचा ५० वा वाढदिवस साजरा केला. जितेंद्र आणि शोभा कपूर यांना लग्नाच्या वाढदिवसानिमित्त चाहते आणि

त्यांच्या १९८३ साली आलेल्या 'हिम्मतवाला' चित्रपटातील 'नैनों में सपना' या आयकॉनिक गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत.

सोशल मीडियावरील एका

# तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ
# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही



■ विकसित भारताला महाराष्ट्राची भक्कम जोड
■ एकत्रित मिशन समृध्द महाराष्ट्र

**नागपूर (नितीन देवळेकर) :** महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचे राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे. मागील अडीच वर्षात महाराष्ट्राच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता आमचं एकत्रित मिशन आहे समृध्द महाराष्ट्राचं. आता आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ. महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. ते म्हणाले की, मागील अडीच वर्षात महायुतीने विकास आणि कल्याणकारी योजनांचं ऐतिहासिक काम केले. मागील अडीच वर्षात विक्रमी कामे झाली. एकही दिवस सुटी न घेता आम्ही काम केलं. त्यामुळे या राज्याच्या निवडणूक निकालांत इतिहास घडला.

**अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचे वचन**

मागील अडीच वर्ष आम्ही एक टीम म्हणून काम केले. त्यामुळेच आमचे सरकार हे जनतेचे लाडकं सरकार झाले. जनतेच्या विश्वासामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. आता अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचं वचन आम्ही देतोय. मुख्यमंत्री म्हणून काम करताना माझे धोरण गतिमान विकास हेच होते तिथे पक्षभेद, द्वेषाला कधी थारा दिला नाही.

**विकासकामांचा स्ट्राईक रेट वाढतच राहणार**

मागील अडीच वर्षात महायुती सरकारच्या विकासकामांचा स्ट्राईक रेट देशात सर्वाधिक होता. यापुढे हा स्ट्राईक रेट वाढतच राहणार आहे. महाराष्ट्राला देशात क्रमांक एकचे राज्य बनविण्यासाठी आम्ही सगळे दिवस-रात्र चोवीस तास काम करत होतोच यापुढेही करू अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

**विदर्भ विकासासाठी ठोस पावले**

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, माझे विदर्भाशी माझे वेगळे नाते आहे ते इथल्या प्रेम करणाऱ्या जनतेमुळे. मुख्यमंत्री असतांना मलाही विदर्भासाठी काहीतरी भरीव करण्याची संधी मिळाली याचा निश्चितच आनंद आहे. मागील दोन्हीही अधिवेशनात आम्ही विदर्भाच्या विकासासाठी ठोस पाऊलं उचलली आहेत आणि त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत. समृध्दी महामार्ग आपण गोंदिया, भंडारा, गडचिरोलीपर्यंत पुढे नेत आहोत. विदर्भातल्या ५ लाख शेतकऱ्यांना धान उत्पादनासाठी हेक्टरी १५ हजार रुपये बोनसची घोषणा मुख्यमंत्री म्हणून पहिल्याच अधिवेशनात मी केली होती. या बोनसची रक्कम आम्ही २० हजार केली आहे. विदर्भ लॉजिस्टिक हब म्हणून विकसित करायचा आहे.

विदर्भ, मराठवाडामधील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी ७० हजार कोटींच्या प्रकल्पांना मान्यता दिली आहे. सुरजागड येथे दोन नवीन प्रकल्प माझ्या कार्यकाळात सुरू झाले. मागील अडीच वर्षात आम्ही ८६ कॅबिनेट बैठका घेतल्या आणि ८५० महत्त्वाचे निर्णय घेतले. छोटे मोठे निर्णय सांगायला बसले तर एक अधिवेशन कमी पडेल, असेही ते म्हणाले.

**अग्रेसर महाराष्ट्र...**

मागील अडीच वर्षात ज्या लोककल्याणकारी योजना राबवल्या. विक्रमी विकासकामे झाली. परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र पहिला आहे, महिला सक्षमीकरणात महाराष्ट्र पहिला आहे, जीएसटीत पहिले आहोत, उद्योगांमध्ये पहिला क्रमांक, पाच लाखांचा आरोग्य विमा देणारे पहिले राज्य, शेतकऱ्यांना मोफत वीज देणारे पहिले राज्य, १० लाख तरुणांना स्टायपेंड देणारे पहिले राज्य, देशातला सर्वाधिक लांबीचा सागरीसेतू करणारे पहिले राज्य आणि सर्वात मोठे मेट्रो नेटवर्क असलेले राज्य, अशी महाराष्ट्राची देशभरात ओळख झाल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**SPORT**

# Border-Gavaskar Trophy: Why Gabba draw vs India is bad news for Australia

**New Delhi -** Australia are known for hammering oppositions when it comes to playing Test cricket at the Gabba. They have made the venue their fortress where teams have historically struggled to make a mark. But there's also a downside to their dominance in Brisbane. In the 21st century, Australia have never gone on to win a Test series when the Gabba Test either ended in a draw of the hosts lost it.

Out of the six times it has happened over the last 24 years, India have been their opponent twice. Back in December 2003, Sourav Ganguly's heroic 144 in the first innings helped India eke out a draw in Brisbane. Back in 2021, Rishabh Pant, Shubman Gill helped India win a Test at The Gabba for the first time when they won by three wickets in a closely-fought encounter.

Back in 2018-19, India won a Test series on Australian soil for the first time under Virat Kohli's leadership. Then in 2020-21, India emerged victorious yet again in




Kohli's absence. Australia, who are known as an invincible force on home soil, are facing the danger of losing three Test series on the trot at home against India. Pat Cummins and Co. found themselves under immense pressure after losing the Perth Test by 295 runs. Jasprit Bumrah and Yashasvi Jaiswal turned out to be too hot to handle for them. But then Mitchell Starc and Travis Head brought forth all their experience to help Australia draw level with a win in the Day-Night Test. At The Gabba, Australia would have fancied their chances until the last session on Day 4. But after Akash Deep and Jasprit Bumrah helped India avoid the follow-on, Australia's chances diminished on the last day. Head was again at his best, but his knock wasn't enough for the Aussies to go 2-1 up. The Melbourne Test is just a week away and Australia have enough time to recharge their batteries. That Josh Hazlewood has been ruled out comes as a big blow, but in Scott Boland, who loves bowling at the MCG, Australia have an apt replacement. Australia are under pressure, but they have ample chances of winning the series.

## Virat Kohli loses cool, involved in heated argument with Australia reporter ahead of 4th Test

**New Delhi -** India's star cricketer Virat Kohli lost his cool at Australian media upon his arrival in Melbourne for the Boxing Day Test against "It was upon seeing the waiting cameras that Kohli became a little heated over what is largely a misunderstanding



locked at 1-1 after the draw at Gabba, both teams will look to take advantage in the Boxing Day Test. India got the dream start to the series

## Ravichandran Ashwin contradicts Rohit Sharma shortly after retirement; 'unusual' behaviour irks India's legend

**New Delhi -** And just like that, it was over. Ravichandran Ashwin, the perennial workhorse of Indian cricket, rode into



their youth. Yep, it's still hitting hard.

Ashwin's decision was similar to MS Dhoni's. During the

# अपघातग्रस्त बोटीची तज्ज्ञांच्या मदतीने तपासणी करणार

## पोलिसांनी आतापर्यंत १० जणांचे नोंदवले जबाब

● मुंबई, विशाल कारंडे :



'गेट वे ऑफ इंडिया' येथून घारापुरीकडे निघालेल्या प्रवासी बोटीला नौदलाच्या 'स्पीड बोट'ने धडक दिल्याप्रकरणी पोलिसांनी तपासाला सुरूवात केली असून तज्ज्ञांच्या मदतीने अपघातग्रस्त बोटीची तपासणी करण्यात येणार आहे. याशिवाय याप्रकरणी नौदलाशीही पत्र व्यवहार करण्यात येणार आहेत. पोलिसांनी तक्रारदारासह १० जणांचे जबाब नोंदवले असून त्यात इतर प्रवाशांचाही समावेश आहे. याप्रकरणी कुलाबा पोलीस ठाण्यात नौदलाच्या स्पीड बोटीचा चालक आणि इतर संबंधित व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निष्काळजीपणामुळे १३ जणांच्या मृत्यूला कारभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. 'नीलकमल' प्रवासी बोट बुधवारी दुपारी पर्यटक आणि प्रवाशांना घेऊन घारापुरीला जात होती. नौदलाच्या एका 'स्पीड बोटी'ने दुपारी ३.५५ च्या सुमारास प्रवासी बोटीला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यामुळे 'नीलकमल' बोटीला भगदाड पडले. त्यातून पाणी आत शिरल्यामुळे बोट बुडू लागली. अपघाताची माहिती मिळताच नौदल, तटरक्षक दल व मुंबई सागरी पोलिसांच्या पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. नौदलाच्या ११ नौका, तटरक्षक दलाची एक व यलोगेट पोलीस ठाण्याच्या ३ नौका, तसेच स्थानिक मच्छीमार नौकांच्या सहाय्याने मदतकार्य सुरू करण्यात आले. नौदलाच्या चार हेलिकॉप्टरचीही मदत घेण्यात आली. दोन्ही बोटींवर प्रवासी आणि कर्मचारी अशा एकूण ११५ जणांना बचाव कार्यात बाचवण्यात आले. मात्र यापैकी १३ जणांचा मृत्यू झाला असून त्यातील आठ जणांचे मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले.

जखमींपैकी जेएनपीटी रुग्णालयात ७५, नेव्हल डॉकयार्डमध्ये २५, अश्विनी रुग्णालयात एक, सेंट जॉर्जमध्ये नऊ, करंजे येथे १२, तर मोरा रुग्णालयात १० जणांना दाखल करण्यात आले आहे. नीलकमल बोटीवरील पाच कर्मचारी सुखरुप असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली. पण या संपूर्ण अपघातात अद्याप दोन प्रवासी बेपत्ता असून त्यात एक पुरूष व लहान मुलाचा समावेश आहे. त्याच्या शोध घेण्यासाठी तटरक्षक दलाच्या बोटी व हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले आहे. अपघात वाचलेले नाथाराम चौधरी (वय २२ वर्षे, राहणार साकीनाका, मुंबई) यांनी याप्रकरणी मुंबई पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ) (ब), २८२, ३२४ (३) (५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्याप्रकरणी पोलिसांनी तपासाला सुरूवात केली असून तक्रारदारासह १० जणांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. अपघातग्रास्त 'नीलकमल' बोटीची तज्ज्ञांमार्फत तपासणीही करण्यात येणार आहे. त्यात मेरिटाईम बोर्डाचीही मदत घेण्यात येणार आहे. याशिवाय नौदलाकडूनही याप्रकरणी तपासणी करण्यात येणार आहे. पोलिस नौदलाच्या संपर्कात असून त्यांच्याकडून मदत घेण्यात येत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महानगरपालिका प्रशासन 'ॲक्शन मोड'वर! अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर कारवाई

● पिंपरी-चिंचवड, अभिजित येरल्लू :




पिंपरी-चिंचवड शहरातील कुदळवाडी- चिखली या भागातील अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड, भंगार दुकानांवर महानगरपालिका प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. भंगार दुकानांमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींच्या घटना आणि बांगलादेशी, रोहिंग्यांच्या बेकायदा वास्तव्याबाबत भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधले आणि दोनच दिवसांत 'बुलडोझर' कारवाई सुरू झाली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.०२ मधील मोरे- पाटील चौक ते कुदळवाडी पोलीस चौकी येथे १८ मीटर रुंद डी.पी. रस्ता (३०० मीटर लांबी) व कुदळवाडी पोलीस चौकी ते विसावा चौक या ३० मीटर रुंद डी.पी. रस्ता ५५० मीटर लाबींच्या डी.पी.रस्ता रस्त्याच्या दुतर्फा सुमारे ९ हजार चौ.मी. क्षेत्रातील ३० आर.सी.सी. बांधकामे, तसेच सुमारे ४ हजार चौ.मी. क्षेत्रामधील ४५ वीट बांधकामांसह पत्राशेड इत्यादीवर अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले आहे.

तसेच, गेल्या दोन दिवसांमध्ये चिखली-कुदळवाडी परिसरातील एकूण १३ हजार चौ.मी. आर.सी.सी. बांधकामे व पत्राशेडवर कारवाई करण्यात आली. यामध्ये बहुतांशी भंगार व्यावसायिकांची अनधिकृत दुकाने होती. मंजूर विकास आराखड्यातील रस्ते विकसित करणेकामी कारवाई या पुढेही सुरु राहील, असा इशाराही महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.

वारंवार लागणाऱ्या आगीच्या घटनांमुळे सोसायटीधारक, स्थानिक नागरिक यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. यासह बेकायदेशीरपणे भंगार जाळून रसायनमिश्रीत पाणी इंद्रायणी नदी पात्रात सोडल्यामुळे नदी प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यासह आगीच्या घटना, बेकायदेशीर भंगार साठवणूक यामुळे या भागात असुरक्षितता, अस्वच्छता आणि पर्यावरणाची हानी होत आहे. विशेष म्हणजे, बांगलादेशमधून बनावट कागदपत्रांच्या आधारे पिंपरी-चिंचवडमध्ये वास्तव्य करणारे बांगलादेशी आणि रोहिंग्या बहुतेककरुन भंगार, रद्दी दुकानांमध्ये काम करत आहेत. ही बाब पोलीस प्रशासनाने केलेल्या कारवाईमध्ये समोर आली आहे. त्यामुळे या कारवाईचे स्थानिक नागरिकांमधून स्वागत होत आहे.

# दसवेलजवळ बस-ट्रॅक्टर अपघातात २५ प्रवासी जखमी

● नाशिक, सचिन कदम :



बागलाण तालुक्यातील ताहाराबाद-पिंपळनेर मार्गावर दसवेल गावाजवळ बुधवारी रात्री राज्य परिवहन बसची ट्रॅक्टरला धडक बसल्याने २० ते २५ प्रवासी जखमी झाले. जखमी प्रवाशांना सटाणा, मालेगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बस नवापूरहून नाशिककडे जात होती. बसची ट्रॅक्टरला पाठीमागून धडक बसली. दसवेलजवळील राजापूर फाटा येथे हा अपघात झाला. अपघाताची माहिती समजताच आजूबाजूचे नागरिक घटनास्थळी धावून आले. जखमी प्रवाशांना मदत करण्यासाठी नागरिकांनी सिद्धी इंग्लिश मीडियम शाळेचे संस्थापक अध्यक्ष तथा मविप्रचे संचालक डॉ. प्रसाद सोनवणे यांच्याशी संपर्क केला. घटनेचे गांभीर्य ओळखून डॉ. सोनवणे यांनी तत्काळ शाळेच्या दोन बस घटनास्थळी पाठवल्या. गंभीर प्रवाशांना प्रथम ताहाराबादच्या शासकीय रुग्णालयात तर काहींना सटाण्यात पाठवण्यात आले. काही प्रवाशांना मालेगाव येथे पाठवण्यात आले. जायखेड्याचे सहायक पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम शिरसाठ यांनी जखमी प्रवाशांची माहिती दिली. त्यानुसार मंगेश गावंडे, मेघराज गांगुर्डे, आशा शेलार, प्रशांत पाटील, अरविंद मावची, प्रमिला कोठावदे, चालक श्रावण कुवर, वाहक शिवाजी बागूल, गणेश देवरे, बेबी अहिरे आदींचा जखमींमध्ये समावेश आहे.

# लाडकी बहीण योजनेसाठी निकष बदलणार का? देवेंद्र फडणवीसांचं विधानसभेत मोठं भाष्य



● नागपूर, नितीन देवळेकर :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल लागताच राज्यात नवे मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ विस्तार, खातेवाटपाची जोरदार चर्चा सुरू झाली. इच्छुक, नाराजांच्या मागण्या-व्यथा चर्चेत आल्या. मात्र, त्याचबरोबर महाराष्ट्रातल्या असंख्य महिलांच्या दृष्टीने उत्सुकतेचा व चिंतेचा असलेला लाडकी बहीण योजनेचा मुद्दाही चर्चेत आला. निकालांनंतर आता लाडकी बहीण योजनेत बदल होणार किंवा त्याचे निकष बदलणार असं बोललं जाऊ लागलं. महायुतीनं आश्वासन दिलेली १५०० वरून २१०० रुपयांची वाढही लांबणार असल्याचं सांगितलं जाऊ लागलं. त्यामुळे यावर अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत. यासंदर्भात देवेंद्र फडणवीसांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत निवेदन सादर केलं आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विरोधी पक्षांनी केलेल्या भाषणांचा, मांडलेल्या मुद्द्यांचा आणि केलेल्या आरोपांचा आढावा घेतला. त्यावर उत्तरं दिलं. त्याचदरम्यान लाडकी बहीण योजनेसंदर्भात घेण्यात येत असलेले आक्षेप व शंकांबाबत त्यांनी भाष्य केलं. दरम्यान, लाडकी बहीण योजनेबाबत उपस्थित करण्यात येणाऱ्या शंका मुख्यमंत्र्यांनी यावेळी फेटाळून लावल्या. "आज या सभागृहाला मी आश्वस्त करू इच्छितो की कोणतीही शंका मनात ठेवू नका.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

■ देवेंद्र फडणवीसांनी आपल्या भाषणात महायुतीला मिळालेल्या मोठ्या विजयासाठी मतदारांचे, लाडक्या बहिणींचे, मित्रपक्षांचे, कार्यकर्त्यांचे आभार मानले. "नवीन सरकार आल्यानंतर विधानसभेतलं हे माझं पहिलं भाषण आहे. म्हणून मी या विधानसभेतील सर्व सदस्यांचं आणि महाराष्ट्राच्या १४ कोटी जनतेचे आभार मानतो. त्यांनी आमच्या महायुतीला घवघवीत यश दिलं. २३७ आमदार सत्तापक्षाच्या बाजूने निवडून आले", असं ते म्हणाले. तसेच, "पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिलेल्या 'एक है, तो सेफ है' या घोषणेला हा विजय म्हणजे जनतेनं दिलेला प्रतिसाद आहे", असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# महिला काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणीसह जिल्हा व ब्लॉक स्तरीय समित्या बरखास्त

● नागपूर, शकील शेख :

विधानसभेतील दारुण पराभवानंतर काँग्रेस पक्षात बदलाचे वारे वाहत असतानाच ,अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अलका लांबा यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या राज्य, जिल्हा आणि ब्लॉक स्तरीय सर्व समित्या तत्काळ प्रभावाने बरखास्त करण्यात आल्या आहेत. संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्यातील महिला काँग्रेसच्या सदस्यत्व मोहिमेला गती देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे काँग्रेसच्या वतीने सांगण्यात आले आहे .

महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षापदी संध्या सव्वालाखे या कायम राहून नवीन समित्या स्थापन करण्याच्या प्रक्रियेचे नेतृत्व करणार आहेत. राज्यातील महिला काँग्रेसची सदस्य मोहीम पुढे नेण्यासाठी आणि नारी न्याय सभासदत्व सत्कार समारंभ आयोजित करणे आणि महाराष्ट्रातील महिला काँग्रेस संघटनेच्या उभारणीसाठी संध्या सव्वालाखे यांच्या सोबत विधानसभा क्षेत्रातील महिला पदाधिकारी सहकार्य करणार आहेत.

# जम्मू काश्मीरच्या राजौरीतील एका गावाला गूढ आजाराचा विळखा

# तुरीच्या दरात आठवडाभरात ९०० रुपयांची घसरण

● अमरावती, दिगंबर जाधव:

आवक जास्त राहू शकते, असा अंदाज